IJRAR.ORG E-ISSN: 2348-1269, P-ISSN: 2349-5138

INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCH AND ANALYTICAL REVIEWS (IJRAR) | IJRAR.ORG

An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# माहिती तंत्रज्ञानाच्या युगात पदवीपूर्व विद्यार्थ्यांचे अवांतर वाचन : एक अभ्यास

**प्रा. यशोदा बापूराव लबडे**

ग्रंथालय प्रमुख

महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, श्रीगोंदा जि.अहिल्यानगर,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे संलग्नित

***सारांश***

*सध्याच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात माहिती ही डिजिटल स्वरुपामध्ये प्रकाशित होण्याचा वेग वाढला आहे. विद्यार्थ्यांना हवी असणारी माहिती ही वेगवेगळ्या सोशल मेडीयाद्वारे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवली जात आहे, अशा माहितीची सत्यता तपासणे गरजेचे असते. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यात अभ्यासक्रमा व्यतिरिक्त अवांतर वाचन महत्वाची भूमिका बजावते, अशा परिस्थितीत पदवीपूर्व विद्यार्थ्यांचे अवांतर वाचन कसे आहे याचा अभ्यास या संशोधन पेपरमध्ये केलेला आहे. त्यासाठी गुगल फॉर्ममध्ये प्रश्नावली तयार करून ती पदवीपूर्व कला, वाणिज्य, विज्ञान आणि संगणकशास्त्र या विद्यार्थ्यांच्या व्हाट्सएप या सोशल मेडीयाद्वारे पाठवून माहिती संकलित केली आहे. संकलित माहितीचे विश्लेषण करून निष्कर्ष काढले आहेत, तसेच शिफारशीही सुचविल्या आहेत.*

***शोधसंज्ञा- माहिती तंत्रज्ञान, अवांतर वाचन, अवांतर वाचनाचे महत्व, पदवीपूर्व विद्यार्थी , सर्वांगीण विकास***

## १. प्रस्तावना

"आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात, जिथे डिजिटल साधनांचा वापर जीवनाच्या प्रत्येक पैलूमध्ये वाढत आहे, तिथे शिक्षणाच्या पारंपरिक पद्धतींमध्येही अनेक बदल होत आहेत. विशेषतः पदवीपूर्व विद्यार्थ्यांसाठी, केवळ अभ्यासक्रमावर आधारित वाचन पुरेसे नसून, अवांतर वाचनाचे महत्त्व अनमोल आहे. अवांतर वाचन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, ज्ञानवृद्धीसाठी, चिकित्सक विचारशक्ती वाढवण्यासाठी आणि सामाजिक भान जागृत करण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. तथापि, स्मार्टफोन, इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या वाढत्या वापरामुळे विद्यार्थ्यांच्या वाचन सवयींवर काय परिणाम होत आहे, हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे." गेल्या काही दशकांत माहिती तंत्रज्ञानाने जगभरातील शिक्षण पद्धतींमध्ये क्रांती घडवून आणली आहे. ई-पुस्तके, ऑनलाइन लायब्ररी, शैक्षणिक ॲप्स आणि विविध माहिती स्त्रोत आता एका क्लिकवर उपलब्ध आहेत. यामुळे वाचनाच्या संधी वाढल्या असल्या तरी, विद्यार्थ्यांचा बराच वेळ मनोरंजक डिजिटल सामग्री पाहण्यात, सामाजिक माध्यमांवर व्यतीत होत असल्याने, त्यांच्या पारंपरिक अवांतर वाचनाकडे दुर्लक्ष होत आहे का, असा प्रश्न उपस्थित होतो. अशा परिस्थितीत, अवांतर वाचनाचे महत्त्व पुन्हा अधोरेखित करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देऊन अवांतर वाचनाकडे त्यांना वळविण्याचा प्रयत्न करता येईल.

**२. अवांतर वाचनाचे महत्त्व**.

- **सखोल ज्ञान आणि व्यापक दृष्टिकोन**

माहिती तंत्रज्ञानाने जगभरातील माहिती एका क्लिकवर उपलब्ध करून दिली आहे. अशा वेळी, विद्यार्थी केवळ त्यांच्या अभ्यासक्रमापुरते मर्यादित न राहता, विविध विषयांवर अवांतर वाचन करून अधिक **सखोल ज्ञान** मिळवू शकतात. यामुळे त्यांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रातील नवीनतम घडामोडी, संशोधन आणि संकल्पना समजून घेता येतात. व्यापक वाचनामुळे त्यांचा **दृष्टिकोन (Perspective)** अधिक विस्तृत होतो.

- **गंभीर विचार आणि विश्लेषण कौशल्ये**

अवांतर वाचन विद्यार्थ्यांना केवळ माहिती गोळा करण्यास मदत करत नाही, तर त्यांना **गंभीरपणे विचार करण्यास (Critical Thinking)** आणि **विश्लेषण करण्यास (Analysis)** प्रोत्साहित करते. वेगवेगळ्या लेखकांची मते वाचल्याने, विद्यार्थी स्वतःचे मत तयार करायला शिकतात आणि माहितीची सत्यता पडताळण्याची सवय लागते. हे कौशल्य आजच्या 'फेक न्यूज' च्या युगात खूप महत्त्वाचे आहे.

- **नवनिर्मिती आणि समस्या सोडवण्याची क्षमता**

विविध विषयांवर वाचन केल्याने विद्यार्थ्यांच्या मनात नवनवीन कल्पना (Innovation) येतात. माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सतत बदल होत असल्याने, **नवीन विचार आणि समस्या सोडवण्याची क्षमता (Problem-Solving Skills)** असणे आवश्यक आहे. अवांतर वाचनामुळे हे गुण विकसित होतात, कारण ते वेगवेगळ्या दृष्टिकोनातून समस्यांकडे पाहण्यास शिकतात.

- **भाषिक कौशल्ये आणि संवाद**

अवांतर वाचनामुळे विद्यार्थ्यांची **भाषिक कौशल्ये (Language Skills)** सुधारतात. नवीन शब्द, वाक्यरचना आणि अभिव्यक्ती वाचायला मिळाल्याने त्यांची लेखनशैली आणि संभाषण कौशल्ये अधिक प्रभावी होतात. माहिती तंत्रज्ञानाच्या जगात प्रभावी संवाद (Effective Communication) हा एक महत्त्वाचा गुण आहे.

- **स्पर्धात्मक फायदा**

आजच्या स्पर्धात्मक जगात, केवळ पदवी मिळवून पुरेसे नाही. नोकरीच्या ठिकाणी किंवा पुढील शिक्षणासाठी, ज्या विद्यार्थ्यांचे ज्ञान आणि कौशल्ये अधिक व्यापक असतात, त्यांना प्राधान्य मिळते. अवांतर वाचन विद्यार्थ्यांना त्यांच्या सहकाऱ्यांपेक्षा **एक पाऊल पुढे (Competitive Edge)** राहण्यास मदत करते. यामुळे त्यांना मुलाखतींमध्ये किंवा गटचर्चांमध्ये अधिक आत्मविश्वास मिळतो.

- **मानसिक विकास आणि ताण कमी करणे**

वाचन हा एक चांगला छंद आहे. तो केवळ ज्ञानामध्ये भर घालत नाही, तर **मानसिक विकासासाठी (Mental Development)** देखील महत्त्वाचा आहे. अवांतर वाचनामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासाच्या ताणातून थोडा विरंगुळा मिळतो आणि त्यांचे मन शांत राहण्यास मदत होते.

**३. साहित्य शोध**

अवांतर वाचन यासंदर्भात अनेक अभ्यास झालेले आहेत त्यामध्ये,

**गालिक, ज्युड डी. (मार्च १९९९)** यांनी त्यांच्या अभ्यासामध्ये असे म्हटले आहे कि, अवांतर वाचन करणे हे पदवीपूर्व विद्यार्थ्यांच्या भविष्यातील यशाचे गमक असते, तसेच सातत्याने वाचन केल्याने विद्यार्थ्यांना त्यांच्या आयुष्यात भरपूर आनंद आणि ज्ञान मिळते.

**फयाज, अहमद लोन (२०१२)** यांच्या अभ्यासानुसार २१व्या शतकातील ग्रामीण आणि शहरी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या वाचन सवयींवरून असे दिसून येते की, शहरी विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची संस्कृती ग्रामीण विद्यार्थ्यांपेक्षा अधिक विकसित झाली आहे. एका महान वाचनशील राष्ट्राच्या निर्मितीसाठी प्रादेशिक वाचन संस्कृतीतील तफावत दूर करण्याची गरज आहे. हे उद्दिष्ट वेगवेगळ्या मार्गांनी साध्य केले जाऊ शकते; तथापि, 'सर्वांसाठी शिक्षण' (Education for all) आणि 'सर्वांसाठी माहिती' (Information for all) हे वाचनशील समाजाचे दोन मुख्य आधारस्तंभ आहेत ज्यावर अधिक भर देण्याची आवश्यकता आहे.

**किंमरली, बी. (जुन २०१२)** यांनी त्यांच्या अभ्यासामध्ये असे म्हटले कि, विद्यार्थ्यांनी अवांतर वाचन केल्याने त्यांच्यामध्ये साकारात्मक उर्जा प्राप्त होते तसेच त्यांना त्यांच्या आयुष्यात आत्मविश्वास प्राप्त होतो.

**वाघमारे, प्रकाश आणि भाविकत्ती (डिसेंबर २०१८)** यांनी त्यांच्या बिदर कर्नाटका येथील पदवीपूर्व विद्यार्थ्यांच्या वाचन सवयींचा अभ्यास केला त्यामध्ये त्यांना असे आढळून आले कि, फक्त ५०% विद्यार्थी ग्रंथालयामध्ये ज्ञान, माहिती आणि करियर यासाबंधीची माहिती मिळविण्यासाठी अवांतर वाचन करतात.

**पांडे, जया आणि चंद्र, सतीश ( एप्रिल २०२४)** यांच्या अभ्यासानुसार विद्यार्थ्यांना त्यांच्या सोयीनुसार वाचन करणे महत्त्वाचे असते, कधीकधी, वाचक डिजिटल वाचन प्लॅटफॉर्ममुळे जास्त प्रभावित होऊ शकतात. जरी डिजिटल वाचन प्लॅटफॉर्म वेळ आणि जागेच्या बंधनाशिवाय वाचनाची संधी देतात, तरीही काही वैशिष्ट्ये जसे की, स्क्रोलिंग, ॲप्लिकेशन्सची आकर्षक रचना आणि स्मार्टफोनमधील मनोरंजनाचे अनेक पर्याय एकाग्र वाचनापासून लक्ष विचलित करू शकतात किंवा वाचकांचे लक्ष कमी करू शकतात.

## ४. संशोधनाची व्याप्ती

सदर अभ्यासामध्ये महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयातील कला, वाणिज्य, विज्ञान आणि संगणक शास्त्र या शाखेतील पदवीपूर्व विद्यार्थ्यांची निवड केलेली आहे.

## ५. संशोधन पद्धती

या अभ्यासासाठी संशोधनाची सर्व्हे ही पद्धत वापरली असून प्रश्नावली गुगल फॉर्ममध्ये तयार करून ती पदवीपूर्व विद्यार्थ्यांच्या व्हाट्सएप या सोशल मेडीयाद्वारे पाठवून माहिती संकलित केली आहे.

## ६. संशोधनाची उद्दिष्टे

- पदवीपूर्व विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची सद्यस्थिती तपासणे.
- माहिती तंत्रज्ञानाच्या स्मार्टफोन, इंटरनेट या साधनांचा विद्यार्थ्यांच्या अवांतर वाचन सवयींवर होणारा परिणाम शोधणे.
- विद्यार्थ्यांच्या अवांतर वाचनामध्ये येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे.
- अवांतर वाचनाला प्रोत्साहन देण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करण्याच्या संधी आणि उपाययोजना सुचवणे."

## ७. संकलित माहितीचे स्पष्टीकरण


महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, श्रीगोंदा येथील महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये पदवीपूर्व कला, वाणिज्य, विज्ञान आणि संगणकशास्त्र यामधील प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या ही ९२८ अशी असून त्यातील ४५९ म्हणजेच ४९.४६ % विद्यार्थ्यांनी प्रश्नावली भरून दिलेली आहे. त्यातील प्रश्नांचे विश्लेषण पुढीलप्रमाणे.

**सारणी क्रमांक १. विद्यार्थ्यांच्या वाचन सवयी**

| | | |
|---|---|---|
| **दररोज** | **२८९** | **६३ %** |
| **आठवड्यातून** | **९८** | **२१.४ %** |
| **महिन्यातून** | **१०** | **२.२ %** |
| **कधीतरी** | **६२** | **१३.५ %** |
| **एकुण** | **४५९** | **१०० %** |


वरील सारणीवरून असे दिसून येते कि, २८९ म्हणजेच ६३ % विद्यार्थी हे दररोज वाचन करतात तर ९८ म्हणजेच २१.४ % विद्यार्थी हे आठवड्यातून वाचन करतात आणि कधीतरी वाचन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण हे १३.५ % असे असून खूपच कमी म्हणजे २.२ % विद्यार्थी महिन्यातून एकदा वाचन करतात.

**चार्ट क्रमांक १. विद्यार्थी वाचत असलेल्या पुस्तकांचे प्रकार**





वरील चार्ट वरून असे दिसून येते कि, कथा/ कादंबरी वाचणारा विद्यार्थ्यांचा ग्रुप ४५९ पैकी २३६ म्हणजेच ५१.४ % असा दिसून येतो. कथा/कादंबरी खालोखाल आत्मविकास १९७ ( ४२.९ %) यावरील पुस्तके वाचली जातात, आणि ११४ (२४.८ %) विद्यार्थी हे चरित्रे यांचे वाचन करतात. तर सर्वात कमी म्हणजेच ९२ ( २० %) विद्यार्थी हे कल्पनारम्य पुस्तके वाचतात.

**चार्ट क्रमांक २. विद्यार्थ्यांना आवडणारे साहित्य**




वरील चार्ट वरून असे दिसते कि, साहित्यिक प्रकार म्हणजेच कथा/ कादंबरी वाचणारे विद्यार्थ्यांचे प्रमाण हे सर्वात जास्त म्हणजेच ते ३०२ (६५.८ %) असे असून वैचारिक साहित्य वाचणारे विद्यार्थी हे १०३ (२२.४% ), चरित्र वाचणारे ९६ (२०.९%), राजकीय साहित्य वाचणारे ९० (१९.६%), विज्ञानवादी साहित्य वाचणारे ९५ (२०.७%) तर सर्वात कमी ८४ (१८.३ %) विद्यार्थी ऐतिहासिक साहित्य वाचतात.

**चार्ट क्रमांक ३. विद्यार्थ्यांना आवडणारे माध्यम प्रिंट अथवा डिजिटल**





वरील चार्टनुसार असे दिसून येते कि, प्रिंट आणि डिजिटल अशी दोन्ही माध्यमे वाचणारे विद्यार्थी हे २९६ (६४.५% ) असे असून हे प्रमाण सर्वात जास्त आहे. सर्वात कमी ५२ (११.३%) डिजिटल मध्यमाव्दरे विद्यार्थी वाचन करतात.

**सारणी क्रमांक २. विद्यार्थ्यांचा वाचनाचा वेळ**

| | | |
|---|---|---|
| अर्धा तास किंवा त्यापेक्षा कमी | २०४ | ४४.४ % |
| अर्धा ते एक तास | ५५ | १२ % |
| एक ते दोन तास | १३४ | २९.२ % |
| दोन तासापेक्षा जास्त | ६६ | १४.४ % |
| एकुण | ४५९ | १०० % |

वरील सारणीवरून असे म्हणता येईल कि २०४ (४४.४ %) विद्यार्थी हे अर्धा तास किंवा त्यापेक्षा वेळ वाचन करतात, तर १३४ (२९.२ % ) विद्यार्थी हे अर्धा ते एक तास वाचन करतात आणि दोन तासापेक्षा जास्त वाचन कारणाते विद्यार्थी ६६ (१४.४ %) असे आहेत. अर्धा ते एक तास वाचन करणारे विद्यार्थी हे ५५ (१२ % ) असे आहेत.

**चार्ट क्रमांक ४. एकट्याने अथवा इतरांबरोबर वाचन करणारे विद्यार्थी**





वरील चार्टनुसार २९६ (६४.५ % ) विद्यार्थी हे एकट्याने वाचन करतात, तर दोन्ही पद्धतीने वाचन करणारे विद्यार्थी हे १३७ (२९.८ % ) असे आहेत.सोबतीने वाचन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण हे सर्वात कमी असून ते २६ (५.७ % ) असे आहे.

**सारणी क्रमांक ३. वाचनाने स्मार्ट बनणारे विद्यार्थी**

| | | |
|---|---|---|
| **होय** | **४४३** | **९६.५ %** |
| **नाही** | **१६** | **३.५ %** |
| **एकुण** | **४५९** | **१०० %** |


वरील चार्टनुसार ४४३ (९६.५ %) विद्यार्थ्यांना वाचन करून आपण स्मार्ट झालो आहोत असे वाटते, तर १६ (३.५ %) विद्यार्थ्यांना अवांतर वाचन करुन आपण स्मार्ट झालो नाहीत असे वाटते.

**चार्ट क्रमांक 5. आपण काय वाचायचे हे कसे ठरवता**





वरील चार्ट नुसार मनाच्या कलानुसार वाचन करणारे विद्यार्थी हे २३२ (५०.५ %) असे आहेत, तर त्याखालोखाल १७३ (३७.७ %) विद्यार्थी हे पुस्तक परीक्षण वाचून त्याप्रमाणे वाचन करतात. ११३ (२४.६ % ) विद्यार्थी हे गरजेनुसार वाचन करतात तर ७५ (१६.३ % ) विद्यार्थी हे लेखकाच्या प्रसिद्धीनुसार वाचन करतात. म्हणजेच मनाच्या कलाला याठिकाणी महत्व देण्यात आले आहे.

**चार्ट क्रमांक ६ विद्यार्थ्याला हवे असणारे पुस्तक न मिळाल्यास**




चार्ट क्रमांक ६ असे दर्शविते कि, २७९ (६०.८ %) विद्यार्थी एखादे पुस्तकाचे वाचन करायचे झाल्यास आणि ते उपलब्ध नसल्यास डिजिटल स्वरुपात उपलब्ध आहे का ते पाहतात, तर १२७ (२७.७ % ) विद्यार्थी ते पुस्तक स्वत: विकत घेतात आणि ५३ (११.५०%) विद्यार्थी ग्रंथालयाला विकत घेण्यास सांगतात.

**चार्ट क्रमांक ७ वाचन केल्याने विद्यार्थ्यांमध्ये जाणवणारा फरक**




वरील बारचार्ट नुसार अवांतर वाचन केल्याने ३३३ (७२.५%) विद्यार्थ्यांच्या ज्ञान आणि अनुभव यामध्ये वाढ होते, तर २०४ (४४.४%) विद्यार्थ्यांच्या वाचनाच्या गतीमध्ये वाढ होते. १८१ (३९.४% विद्यार्थ्यांना स्वत; चा विकास होतो असे वाटते, १६३ (३५.५ % ) विद्यार्थ्यांमध्ये वाचन केल्याने एकाग्रता वाढते, १५८ (३४.४ % ) अवांतर वाचन केल्याने त्यांना येणारे तान-तणाव कमी होतात. १५४ (३३.६ %) विद्यार्थ्यांच्या शब्दसंग्रहामध्ये वाढ होते, तर १५० (३२.७ % ) विद्यार्थ्यांमध्ये संवाद कौशल्य सुधारते, सर्वात कमी ९६ (२०.९ % ) विद्यार्थ्यांचे मनोरंजन होते असे दिसते.

## ८. निष्कर्ष

महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय,श्रीगोंदा येथील महाविद्यालयातील कला, वाणिज्य, विज्ञान आणि संगणकशास्त्र पदवीपूर्व विद्यार्थ्यांचे अवांतर वाचन : एक अभ्यास हा अभ्यास करण्यात आला आहे, यामध्ये प्रश्नावली वापरून माहिती संकलित केली होती, माहितीचे विश्लेषण करून पुढीलप्रमाणे निष्कर्ष आलेले आहेत.

- महाविद्यालयातील जास्तीत जास्त विद्यार्थी हे दररोज अवांतर वाचन करतात.
- अवांतर वाचन करत असताना महाविद्यालयातील पदवीपूर्व विद्यार्थी यांचे वय पाहता त्यांच्या मनात अनेक प्रकारचे स्पंदने निर्माण होतात, त्यामुळे बऱ्याच मोठ्या विद्यार्थ्यांच्या गटाने कथा/कादंबरी या साहित्यप्रकारची निवड केलेली दिसते.
- माहिती तंत्रज्ञानाच्या युगात जास्तीत जास्त विद्यार्थी हे प्रिंट आणि डिजिटल अशा दोनही स्वरूपातील पुस्तकं वाचतात,प्रिंट पुस्तक मिळत नसेल तर विद्यार्थी डिजिटल आवृत्तीचा वापर करताना दिसतात, तर प्रिंट स्वरूपातील पुस्तक वाचणारे विद्यार्थी हे बरेच आहेत, फक्त डिजिटल स्वरूपातील वाचन करणारे विद्यार्थी कमी आहे.
- जास्तीत जास्त विद्यार्थी हे साहित्यिक म्हणजेच कथा/कादंबरी वाचतात तर बरेच विद्यार्थी वैचारिक साहित्य वाचन करतात.
- बहुसंख्य विद्यार्थी हे सरासरी अर्धा तास किंवा त्यापेक्षा कमी वेळ अवांतर वाचन करतात, तर बरेच विद्यार्थी हे एक ते दोन तास वाचन करतात आणि दोन तासापेक्षा जास्त अवांतर वाचन करणारे विद्यार्थीही चांगले आहेत.

- जास्तीत जास्त विद्यार्थी हे एकट्याने अवांतर वाचन करणारे आहेत, तर दोन्हीही पद्धतीने वाचन करणारे विद्यार्थीही बरेच आहेत.
- सर्वात जास्त विद्यार्थी हे अवांतर वाचन करून स्मार्ट बनलेले आहेत.
- बहुतांश विद्यार्थी हे मनाच्या कलानुसार आणि पुस्तक परीक्षण यानुसार वाचन साहित्याची निवड करतात, तर गरजेनुसार वाचन करणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाणही चांगले आहे.
- विद्यार्थ्याला एखादे अवांतर पुस्तक वाचन करायचे झाल्यास आणि ते ग्रंथालयामध्ये उपलब्ध नसल्यास जास्तीत जास्त विद्यार्थी ते डिजिटल स्वरूपामध्ये उपलब्ध आहे का याचा शोध घेतात, तसेच न मिळाल्यास ते पुस्तक स्वत: विकत घेतात.
- अवांतर वाचन केल्याने जास्तीत जास्त विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान आणि अनुभव यामध्ये वाढ होते असे दिसते, तर बऱ्याच विद्यार्थ्यांमध्ये वचनाच्या गतीमध्ये वाढ होते. त्यानंतर अनेक विद्यार्थ्यांना असे वाटते कि अवांतर वाचन केल्याने त्यांच्यामध्ये स्वत: चा विकास होतो, एकग्रता वाढते, तान-तणाव कमी होतात, शब्दसंग्रहामध्ये वाढ होते, तर सर्वात कमी विद्यार्थी मनोरंजन व्हावे म्हणून अवांतर वाचन करतात.

## ९. शिफारशी

- पदवीपूर्व विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचन करण्याची आवड निर्माण व्हावी यासाठी त्यांना प्रोत्साहन देणे गरजेचे वाटते त्यासाठी ग्रंथालय प्रमुख यांनी नवीन येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उद्बोधन वर्ग घेणे आवश्यक आहे. ग्रंथालयाची भेट घडवून आणून त्याना अवांतर वाचन विभाग, त्यातील पुस्तके दाखवेत.
- पदवीपूर्व विद्यार्थ्यांसाठी नियमितपणे पुस्तक परीक्षण सपर्धा, उत्कृष्ट वाचक पुरस्कार देणे, वाचन कट्टा तयार करणे यासारखे उपक्रम आयोजित करावेत व जास्तीत जास्त विद्यार्थी यामध्ये कसे सहभागी होतील यासाठी प्रयत्न करणे गरजेचे वाटते.
- विद्यार्थ्यांना एखादे पुस्तक वाचनास हवे असल्यास ते ग्रंथालयामध्ये उपलब्ध नसल्यास ग्रंथालय प्रमुखांनी प्रिंट अथवा डिजिटल स्वरूपातील पुस्तक त्वरित उपलब्ध करून द्यावे.

## १०. समारोप

वरील सर्वेक्षणातून विद्यार्थ्यांच्या वाचन सवयी, आवडीनिवडी आणि अवांतर वाचनाच्या जाणवलेल्या परिणामांचे सर्वसमावेशक विश्लेषण सादर केलेले आहे. या निष्कर्षांवरून असे दिसून येते की विद्यार्थ्यांचा एक मोठा गट वाचनामध्ये खूप सक्रिय आहे, ज्यापैकी बहुसंख्य विद्यार्थी दररोज अवांतर वाचन करत असल्याचे सांगतात. विद्यार्थ्यांच्या आवडीनिवडी विविध प्रकारच्या कथाकथनापासून ते आत्म-विकास आणि ऐतिहासिक विषयांपर्यंत पसरलेल्या आहेत. वाचनाच्या स्वरूपातही लक्षणीय लवचिकता दिसून येते, ज्यात छापील आणि डिजिटल अशा दोन्ही प्रकारच्या साहित्याला प्राधान्य दिले जाते. तसेच, जेव्हा प्रिंट पुस्तके उपलब्ध नसतात, तेव्हा विद्यार्थी डिजिटल पर्यायांचा सक्रियपणे शोध घेतात. अवांतर वाचन केल्याने विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी लागते, त्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात, आत्मविश्वास निर्माण होतो, नवीन आणि व्यापक दृष्टीकोन तयार होतो, विचार करण्याची प्रवृत्ती वाढते, कल्पनाशक्ती, सर्जनशीलता यामध्ये वाढ होते. विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचन करून एकाग्रता वाढते आणि स्वत: चा विकास होतो. अवांतर वाचनाला बौद्धिक वाढ, वैयक्तिक विकास आणि भावनिक आरोग्यासाठी एक महत्त्वाचे माध्यम मानले जाते, ज्यामुळे शैक्षणिक आणि वैयक्तिक दोन्ही क्षेत्रांमध्ये त्याची महत्त्वाची भूमिका अधोरेखित होते.

## ११. संदर्भसूची

1. Gallik,Jude.1999). Do They Read for Pleasure? Recreational Reading Habits of College Students. Journal of Adolescent & Adult Literacy, Vol. 42, No. 6 (Mar., 1999), pp. 480-488.
2. Jabbar, Abdul & Warraich, Nosheen. (2022). Gender differences in leisure reading habits: a systematic review of literature. Global Knowledge Memory and Communication. ahead-of-print. 10.1108/GKMC-12-2020-0200.
3. Kimberly B. Pyne. (2012). Reading and College Readiness. Educational Readership.(e-journal) Vol.69.P.1-4.
4. Lone, Fayaz Ahmad. (2012). "Reading Habits of Rural and Urban College Students In the 21st Century". Library Philosophy and Practice (e-journal). 709.
5. Pandey, J. & Chandra, S. (2024). Reading habits among college students. Pedagogy of Learning, 10 (2), 11- 22. DOI: 10.46704/pol.2024.v10i02.002
6. Waghmare Prakash & Bhavikatti. (2018). “Reading Habits among the Undergraduate Students of Government First Grade College Bidar (Karnataka, India): A Case Study” Library Philosophy and Practice (e-journal). 2050. http://digitalcommons.unl.edu/libphilprac/2050